INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# शालेय शिक्षणात ग्रंथालयाची भूमिका

## (Role of the Library in School Education)

**प्रा.डॉ. महारुद्र प्रभू गव्हाणे**
ग्रंथपाल,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी. ता.गेवराई, जि.बीड -४३११४३
E-mail: gavhane.mp@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/02.2025-13228976/IRJHIS2501010

***सारांश :***

*शिक्षण हे वर्तन बदलाचे साधन मानले जाते. म्हणून ग्रंथालयामार्फत ग्रंथप्रदर्शन भरुन विद्यार्थ्यांना पुस्तकाची ओळख करून दिल्या जाते. तसेच ग्रंथालयामार्फत विविध व्याख्यात्याची व्याख्याने आयोजित करून विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी प्रयत्न केली जातात. तसेच चर्चासित्राचेही आयोजन करून कोणतीही उपयुक्त संकल्पना समजून घेण्यासाठी अशा चर्चा उपयुक्त ठरतात अशा चर्चासित्र व व्याख्यानामधुन विद्यार्थ्यांना प्रश्न निर्माण होतात व त्यांचा कल वाचनाकडे आकर्षित होतो. यामधुनच विद्यार्थी भाषण, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा याकडे वळतो. ग्रंथालयामार्फत निबंध स्पर्धाचेही आयोजन केले जाते त्यामुळे विद्यार्थी ग्रंथालयात येऊन पुस्तक घेतो. म्हणजे ग्रंथालयामार्फत वाचकांना वाचनाची दिशा मिळते विद्यार्थ्यांचे श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन ही भाषिक कौशल्य विकसीत होतात आणि विद्यार्थी निबंधलेखन, पत्रलेखन, सारांश लेखन काव्यलेखन व भविष्यात विद्यार्थी ग्रंथ परिक्षणही चांगल्या प्रकारे करू शकतो.*

**प्रस्तावना:**

अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विविध विषयाची पुस्तके वाचन करण्यासाठी ग्रंथालय महत्वाची भुमिका बजावते अभ्यासक्रमाची पुस्तके बाजारात किंवा शाळेमधुन मिळतात. अशी पुस्तके परिक्षा देण्यासाठी किंवा पुढच्या वर्गात जाण्यासाठी वाचावीच लागतात परंतु अवांतर पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देण्याचे काम ग्रंथालय करते ग्रंथालयामार्फन किंवा शाळेने आयोजित केलेली विविध कार्यक्रम मग त्यामध्ये राष्ट्रपुरुषांची जयंती किंवा पुण्यतिथी तसेच व्याख्यान्काव्यवाचन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यामधुन विविध विषयाची माहिती होते. त्यासाठी विदयार्थी ग्रंथालयाकडे येऊन त्याविषयासंदर्भातील पुस्तके मागतो. अशी पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान वृद्धींगत करतो ग्रंथालय यासाठी विशेष प्रयत्न करतं. विद्याथ्याना वाचनाची सवय लागावी यांच्या शब्दसंग्रहात वाद व्हावी म्हणून ग्रंथालयामार्फत विशेष प्रयत्न केले जातात. आजच्या सोशल मिडीयाच्या जमान्यामध्ये वाचनाचा कल कमी होत आहे. मोठी ग्रंथसंपदा वाचनाकडे वाचक फिरकताना दिसन नाही. म्हणून भारत सरकार 'वाचाल तर वाचाल' ही संकल्पना वाचकापर्यंत घेऊन जाण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहे. भारत सरकारने वयवर्ष ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षण सक्तीचेव मोफत केले आहे. २०२३ या वषमधील 'असर' नावाच्या संस्थेच्या

ASER (Annual Status of Education Report) अहवालानुसार इयत्ता आठवीच्या मुलांना दुसरीच्या वर्गातील पुस्तके वाचता येत नसल्याचे दिसुन आले. म्हणजे विद्यार्थी वाचनाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते त्यामुळे महाराष्ट्र शासनानेही उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत, विद्यापीठ, महाविदयालय व सार्वजनिक ग्रंथालयामार्फत **'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'** हे अभियान ०१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविण्याचे ठरविले. या पंधरवाड्यामध्ये ग्रंथालयामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यामध्ये ग्रंथालय स्वच्छता, ग्रंथप्रदर्शन, सामुहिक ग्रंथवाचन, लेखक वाचकाच्या भेटीला, लेखन विषयक कार्यशाळा, व ग्रंथपरिक्षण असे १५ दिवस विविध कार्यक्रम घेऊन विद्याथ्यार्ना वाचनासाठी प्रवृत्त केले गेले. काही विद्यार्थ्यांनी स्वतःची पुस्तके वाचली तर उर्वरीत विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून पुस्तके वाचण्यासाठी दिली विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे विचारपूर्वक वाचन करून त्यावर चिंतन करून दिलेल्या पुस्तकाचे चांगल्या प्रकारे ग्रंथपरिक्षण केले. त्यामध्ये उदाहरण दयायचे झाले तर **"लेखक डॉ.संजय गायकवाड यांनी लिहिलेले "यशाचे सारथी' या** ग्रंथाचे परिक्षण विद्यार्थ्यांनी फार चांगल्या प्रकारे केले त्यामधे मिया यश मिळवणार म्हणून चालत नाही तर त्यासाठी खूप कष्ट करावे लागतात.हि प्रेरणा विद्यार्थ्यांनी घेण्यासारखी आहे.आत्मविश्वास हे स्वतःची क्षमता वाढविण्याचे टॉनिक आहे.तर दुरदृष्टी-हे यशस्वी जीवनाचे होकायंत्र आहे.तर **डॉ.महेश खरात यांचे "अहिल्याबाई होळकर'** या ग्रंथाच्या परीक्षणामध्ये सांगितले आहे कि'माणसाने जे घडविले ते जीवापाड जपले पाहिजे हा थोडक्यात सारांश सांगितला आहे

**ग्रंथालयाची भूमिकाः**

डॉ. एस आर रंगनाथन यांनी ग्रंथालयशास्त्राची पंचसुत्री सांगितलेली आहेत्यामध्ये पहिले सुत्र 'ग्रंथ उपयोगासाठी आहेत" हे सांगितले आहे म्हणून ग्रंथपाल नेहमी प्रयत्नशिल असतो की ग्रंथाचा उपयोग झाला पाहिजे. म्हणून यावर्षीच्या दिवाळीच्या सुट्टीमध्ये शाळेतील वाचकांना ग्रंथ वाचनासाठी दिले. त्यामध्ये बहुसंख्य विद्यार्थी वाचकांना या उपक्रमामध्ये सहभाग घेतला दिपावलीच्या सुट्टीनंतर वाचकांनी वाचलेल्या ग्रंथांचे परिक्षण लिहुन आणले सर्व वाचकांनी लिहुन आणलेल्या ग्रंथ परिक्षणाची तपासणी ग्रंथपाल व भाषाविषयाच्या अध्यापकाकडून करून घेण्यात आली. या परिक्षणामधून पहिला, दुसरा आणि तिसरा असे कमांक काढुन त्यांना बक्षीस देण्यात आले याचे वितरण एक कार्यक्रम घेऊन देण्यात आले. या कार्यक्रमामुळे शाळेतील सर्वच विद्याथ्यर्थ्यांना वाचनाची आवड निर्माण झाली व विद्यार्थी अध्यापकांना चांगल्या पुस्तकाविषयी चर्चा करू लागली. त्या बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाच्या दिवशी ग्रंथालयाचे ग्रंथप्रदर्शनाचेही आयोजन केले. त्यामुळे विद्यार्थी वाचकांना जी पुस्तके माहिती नव्हती ती पुस्तके पाहण्यात आली व ती पुस्तके वाचण्यासाठी मागणी करु लागली. ग्रंथालयाच्या सूचनाफलकावर ग्रंथपाल नियमीत एक स्वच्छ हस्ताक्षरामध्ये सुविचार लिहला जातो त्या हस्ताक्षराकडे विद्यार्थी वाचकाचे लक्ष जावे व आपलेही हस्तांतर स्वच्छ असावे म्हणून विदयार्थी प्रयत्न करतात " महात्मा गांधीजीनी एका ठिकाणी म्हटलेले आहे की सुंदर हस्ताक्षराला शिक्षणाचे अविभाज्य अंग म्हटले आहे. ग्रंथालयामार्फत विविध विषय घेऊन निबंध स्पर्धाचेहीआयोजन केले जाते. त्यामधुन विदयार्थी वाचनाकडे वळतात. तसेच त्यांच्या निबंध लेखनामुळे विद्याथ्याचे हस्तांतरही सुधारण्यासाठी मदत होते. सुंदर हस्तांतर हा दागिना आहे निबंध लेखनामुळे विद्यार्थ्यांना विविध राष्ट्रपुरुषाची माहिती मिळते. राष्ट्रीय एकात्मताही यामुळे विद्यार्थ्यांमध्ये रुजण्यास मदत होते.

आजच्या शिक्षण पद्धतीद्वारे जे शिक्षण दिले जाते त्यामधून विदयार्थ्यांची शिक्षणाची ज्ञानलालसा पुर्ण होत नाही विद्यार्थी जर केवळ क्रमिक पुस्तके वाचून पाठांतर करून परीक्षा पास झाला तर त्याच्या ज्ञानात भर पडत नाही. म्हणजे खऱ्या अर्थाने ज्ञानोपासना केली असे म्हणता येणार नाही. त्यासाठी विदयार्थ्यांमधील असलेली जिज्ञासा जोपासून ती वाढीला लावण्यासाठी त्याची वाचनाची आवड

वाढविली पाहिजे.

शालेय जीवनातील विदयार्थ्यांचे वय संस्कारक्षम असते. हा काळ त्याच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाला पोषक ठरला पाहिजे म्हणून शाळांनी विध्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी, मनोवृत्ती निर्माण करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक विषमता, सहिष्णूता, सहजीवन यांचे महत्व पटवून दिले पाहिजे. तसेच देशाबद्दलचा आदर, देशाभिमानी वृत्ती निर्माण करून लोकशाहीप्रधान देशात चारित्र्यसंपन्न, सत्प्रवृत्त नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी शालेय शिक्षणावर आहे. यासाठी विदयार्थ्यामध्ये वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे. शाळांनी विविध वक्तृत्वस्पर्धेचे आयोजन केले पाहिजे, राष्ट्रपुरुषांच्या जयंतीदिनी विदयार्थ्यांना भाषण करण्याची संधी दिली पाहिजे म्हणजे विद्यार्थी आवांतर वाचन करतील.

विद्यार्थ्यामध्ये आधुनिक विचारसरणी निर्माण करण्याचे साधन म्हणून ग्रंथालयाकडे पाहिले जाते शाळेत ग्रंथालय असेल तर विदयार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मिळेल. वाचायला शिकल्यानंतर मुलांना वाचनाची खुप आवड असते मुले वाचायला खुप उत्सुक असतात 'नाटकातला एक प्रसंग आहे. 'अहो मला वाचायला येतय' या नाटकात दिवाकरांनी सुंदर चित्रण केलेले आहे जाहिरातीचा एक कागद' वाटप करणारा व्यक्ति रस्त्यावरील छोट्या मुलाला तो कागद देत नाही त्यावेळेस त्या मुलाला वाटते की आपल्याला वाचता येत नसेल, म्हणून त्याने आपल्याला तो कागद दिला नाही. पण तो मुलगा त्या कागद वाटणाऱ्या व्यक्तिच्या मागे धावून म्हणतो की 'अहो मला वाचायला येतयं'. एवढी वाचनाची आवड मुलांमध्ये असते वाचनाची ही आवड मुलांमध्ये अगदी लहान वयामध्ये निर्माण झालेली असते लहान वयात मुलांना वाचून दाखवलेले खूप आवडते ते लक्षपूर्वक ऐकत असतात. अगदी तुमच्या ओठाच्या हालचाली आवाजातील मधुरता यामुळे मुलांना ऐकतच रहावे असे वाटते वाचनाची प्रक्रिया सतत चालू रहावी असे त्याला वाटते. अभिरुची ही एक भाव आहे.

शालेय जीवनात विदयार्थ्यांच्या हातात चांगले ग्रंथ दिले तर त्यांच्या वाचनाने त्यांना त्यांच्या भावी जीवनाच्या वाटचालीसाठी शिदोरी मिळू शकते. त्यांची वाटचाल सुकर होते विद्यार्थी पाठ्यपुस्तकावर अवलंबून न राहता अनेक संदर्भग्रंथांचा आणि साहित्याचा वापर करून समाजात चांगला नागरिक बनवण्याचा ग्रंथालय प्रयत्न करते ग्रंथालयातील साधनांचा शालेय शिक्षणात अधिकाधिक वापर व्हावा म्हणून 'शालेय ग्रंथालय' शालेय अभ्यासक्रमाचा ठभाग बनले पाहिजे. विद्यार्थ्यांना चांगल्या वाचनाची गोडी लावुन त्यांना वाचते करण्याचे मोलाचे काम शालेय ग्रंथालय करत असते.

त्यांची शिक्षणासंबंधीची अनास्था, शिस्तीचा अभाव यासारख्या शालेय शिक्षणातील समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर करण्याचे शिक्षण देऊन आणि वाचनाची गोडी लावून कमी करता येतात. पोपटपंची करून मिळवलेल्या ज्ञानापेक्षा स्वशिक्षणाने प्राप्त केलेले ज्ञान निश्चितच फायदयाचे असते. विदयार्थी केवळ क्रमिक पुस्तकावर अवलंबून न राहता ग्रंथालयात जाऊन माहिती मिळवतील ज्या शाळेतील विद्यार्थी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करतील त्या शाळेचे शैक्षणिक उदिष्टये उत्तम प्रकारे पार पडतील.आपल्या देशातील शिक्षण पध्दतीत ज्या सुधारणा व्हावयास हव्या होत्या झालेल्या नाहीत.

माध्यमिक शिक्षणाचा विचार करता आपण आजही विदयार्थ्यांना शिक्षकाच्या साचेबंद शिक्षण पद्धतीत अडकवून ठेवले आहे खऱ्या शिक्षणाच्या आनंदापासून त्यांना अड वंचित ठेवले आहे क्रमिक पुस्तकाबाहेर इतर काही साधने आहेत याचा विचारच केला जात नाही. यामधुन विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा भागविली जात नाही. त्यासाठी ग्रंथ व इतर साधनाची गरज असते हा विचार संस्थाचालक व शिक्षक मान्य करतील. त्यासाठी शाळेत उत्तम, सुसज्ज, ग्रंथालये असली पाहिजेत व शिक्षण पध्दतीत शालेय ग्रंथालयांना महत्वाचे स्थान दिले पाहिजे.

**निष्कर्ष :**

पाश्चात्य देशात संगणक आणि टी.व्हीचा प्रसार आपल्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. आपण नेहमी एक तकार ऐकतो की, मुले, मोठी माणसे टी.व्ही, मोबाईला चिकटून बसतात म्हणून वाचनाची आवड कमी होत चालली आहे आई-वडिल पुस्तके वाचत असतील तर त्यांची मुलेही वाचतील आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे ज्ञान, बौद्धीक संपदा, कला, साहित्य इत्यादिची साधने मुबलक प्रमाणान उपलब्ध आहेत. माहितीचे मायाजाल आपणा सर्वासाठी खुले आहेत. भारतीय भाषात आणि उतर जागतिक भाषात माहितीचा खजिना उपलब्ध आहे. इटरनेटच्या साहि सहाय्याने आपण ई- कॉन्फरसिंग करू शकतो. नॉलेज इज पॉवर ज्ञान हीच शक्ती' हे बोधवाक्य आहे. नवोदित साहित्यकारांना त्यामुळे भरपुर वाव आहे

**संदर्भ ग्रंथ:**


१) खरमाटे, वामनराव आत्माराम : वाचनाचे महत्व, 'शिक्षण संक्रमण' जाने, २००८.

२) बाहेती, एस. आर : विद्यार्थी जीवन आणि वाचन, माहिती युग, २००६.

३) लोहकरे, रोहिदास सदाशिव : ग्रंथालयातील विविध उपक्रम, शिक्षण संक्रमण, जानेवारी २००६.

४) नाईक, चित्रा : शालेय ग्रंथालये, २००९.

५) नांदेडकर, श्रीधर : प्रतिष्ठान, वाचनसंस्कृती विशेष, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद. मार्च-जुन,२००७.

६) तुपे,नवनाथ : वाचन दिशा आणि दृष्टीकोन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.२००८.